**पर्यावरणविषयक जनसुनावणीचे इतिवृत्त :**

**प्रकल्प प्रवर्तक महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांच्या प्रस्तावित नागपूर मुंबई शीघ्रसंचार द्रुतगती महामार्गाच्या (महाराष्ट्र समृध्दी महामार्ग) नाशिक जिल्ह्यातील मौजे तारांगणपाडा, तालुका-इगतपुरी ते मौजे बोर्ली, तालुका-इगतपुरी जिल्हा-नाशिक येथील ९.० कि.मी.लांबीच्या प्रस्तावित शिघ्रसंचार द्रुतगती महामार्गासाठी (पॅकेज-५) पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतचा इतिवृतांत**

प्रकल्प प्रवर्तक महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई यांच्या प्रस्तावित नागपूर मुंबई शिघ्रसंचार द्रुतगती महामार्गाच्या (महाराष्ट्र समृध्दी महामार्ग) नाशिक जिल्ह्यातील मौजे तारांगणपाडा, तालुका-इगतपुरी ते मौजे बोर्ली, तालुका-इगतपुरी जिल्हा-नाशिक येथील ९.० कि.मी.लांबीच्या प्रस्तावित शिघ्रसंचार द्रुतगती महामार्गासाठी (पॅकेज-५) पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी दिनांक २४ जानेवारी, २०१८ रोजी दुपारी ०३.०० वाजता र.जी. चांडक माहेश्वरी मंगल कार्यालय, गांधी चौक, इगतपुरी, तालुका- इगतपुरी, जिल्हा- नाशिक येथे आयोजित करण्यात आलेली होती.

सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई- ०२/२०१८, व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/ बी-२४५, दि. १९-०१-२०१८ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती गठन करण्यात आली.

१) श्री राधाकृष्णन् बी., : **अध्यक्ष**
मा. जिल्हादंडाधिकारी,नाशिक

२) श्री आर. यु. पाटील, : **सदस्य**
प्रभारी, प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ, नाशिक,
(मप्रनि मंडळ,मुंबई यांचे प्रतिनिधी)

३) श्री. अ. ज. कुडे, : **समन्वयक**
उप प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, नाशिक

श्री. अ. ज. कुडे, समन्वयक,पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी सुरूवातीला सर्व उपस्थितांचे स्वागत करुन जनसुनावणी समिती अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

समन्वयक यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व पुढिल १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यापुर्वी पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आले आहे. उप प्रादेशिक कार्यालय, नाशिक यांना प्रकल्प प्रवर्तक महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई यांचा प्रस्तावित नागपूर मुंबई शिघ्रसंचार द्रुतगती महामार्गाच्या (महाराष्ट्र समृध्दी महामार्ग) नाशिक जिल्ह्यातील मौजे तारांगणपाडा, तालुका-इगतपुरी ते मौजे बोर्ली, तालुका-इगतपुरी जिल्हा-नाशिक येथील ९.० कि.मी.लांबीच्या प्रस्तावित शिघ्रसंचार द्रुतगती महामार्गासाठी (पॅकेज-५) पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीसाठी अर्ज प्राप्त झाला. सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ अन्वये संवर्ग "७ (एफ)" वर्गात मोडत आहे. उपरोक्त प्रकल्प प्रर्वतकांना नियोजित प्रकल्पासाठी केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या दिनांक २८ व २९ जून, २०१६ रोजी झालेल्या १६० व्या बैठकीत पर्यावरण आघात मुल्यांकन अभ्यासाची रुपरेषा मंजूरी (Sanction of Terms of Reference) मिळालेली आहे.

समन्यवक यांनी असे सांगितले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

वरिल पर्यावरण अधिसुचनेनुसार एक महिना अगोदर स्थानिक वृत्तपत्रात पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी सूचना देणे बंधनकारक आहे. त्याअनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय, नाशिक यांनी स्थानिक वृत्तपत्र दैनिक लोकमत यात मराठीसाठी व राष्ट्रीय वृत्तपत्र दी टाईम्स ऑफ इंडिया यात इंग्रजीसाठी दिनांक ०५ डिसेंबर, २०१७ रोजी पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी सूचना प्रसिध्द केली होती. त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयी काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या लेखी नोंदविण्याचे आवाहन करण्यात आलेले होते.

त्याप्रमाणे नियोजित प्रकल्पाविषयीचा पर्यावरण मुल्यांकन आघात अहवालाची व कार्यकारी सारांश अहवालाची प्रत भारत सरकारच्या विभागीय कार्यालय. वने व पर्यावरण मंत्रालय -नागपूर, मा. जिल्हादंडाधिकारी कार्यालय-नाशिक, जिल्हा परिषद- नाशिक, गट विकास अधिकारी, पंचायत समिती-इगतपुरी, तालुका -- इगतपुरी, जिल्हा – नाशिक, तहसिलदार – इगतपुरी, जिल्हा-नाशिक, जिल्हा उद्दयोग केंद्र- नाशिक, मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई, व मप्रनि मंडळाचे संकेत स्थळ, पर्यावरण विभाग-मंत्रालय, मुंबई, प्रादेशिक कार्यालय,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक, उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक व प्रकल्प परिसरातील सर्व ग्रामपंचायत कार्यालये (एकूण ०५)- तारंगपाडा, पिंपरी सिद्रोददीन, नांदगाव सदो, फानगुन गवाण, वघ्याची वाडी तालुका- इगतपुरी, जिल्हा- नाशिक येथे सामान्य जनतेसाठी उपलब्ध करण्यात आले होते.

समन्वयक यांनी असे सांगितले की उप प्रादेशिक कार्यालय, नाशिक यांना वरिल प्रकल्पाबाबत ०२ (दोन) लेखी आक्षेप /सुचना प्राप्त झालेल्या आहेत व त्याची एक छायांकित प्रत प्रवर्तकास माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी देण्यात आली आहे व वरील नमुद केलेल्या आक्षेप / सुचनांची एक छायांकित प्रत सदर बैठकीच्या ईतिवृत्तांसोबत जोडलेली आहे.

अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन प्रकल्प अधिका-यांना पर्यावरण विषयक उपाय योजनांची माहिती राज्य व स्थानिक भाषा मराठीत करण्याची सूचना केली.

श्री आर. यु. पाटील, सदस्य तथा प्रभारी प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सांगितले की महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ हे या बैठकीत फक्त समन्वयक म्हणूनच जबाबदार असून बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप हे केंद्र शासनाच्या तज्ञ समितीस सादर करण्यात येतील.

प्रकल्प अधिका-यांनी पर्यावरण विषयक उपाय योजनांची माहिती सादरीकरणाव्दारे उपस्थित जनसमूहास दिली.

अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन प्रकल्प अधिका-यांना पर्यावरण विषयक उपाय योजनांची माहिती राज्य व स्थानिक भाषा मराठीत करण्याची सूचना केली.

प्रकल्प अधिका-यांनी पर्यावरण विषयक उपाय योजनांची माहिती सादरीकरणाव्दारे उपस्थित जनसमूहास दिली.

श्री टोके, प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की भारत सरकारने पायाभूत सोईसुविधांना चालना देण्याच्या धोरणानुसार दहा (१०) जागतिक दर्जाचे महामार्ग बांधण्याचे योजीले आहे. जेणेकरुन देशातील सर्व शहरांना एकत्र जोडण्यात येऊन विकासाला चालना मिळेल.

प्रकल्प प्रवर्तक सल्लागार यांनी सांगितले की महाराष्ट्र शासनाच्या पायाभूत सुविधा देण्याच्या नियोजित धोरणानुसार विद्दमान मार्गांमध्ये एकाचवेळी मोठ्या प्रमाणावर होणा-या रहदारीमुळे पडणारा ताण नागपुर-मुंबई शीघ्रसंचार द्रुतगती महामार्गामुळे (NMEW) कमी होण्यास मदत होईल. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादीत यांना नागपूर-मुंबई शिघ्रसंचार द्रुतगती महामार्गाची (NMEW) आखणी व अंमलबजावणी यंत्रणा म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. प्रस्तावित महामार्ग हा दहा (१०) जिल्ह्यातून जाणार असून विदर्भ, मराठवाडा आणि कोकण प्रदेशापर्यंत येणार आहे. या योजनेचा मुख्य भाग हा नागपूर, वर्धा, अमरावती, वाशिम, बुलढाणा, जालना, औरंगाबाद, अहमदनगर, नाशिक व ठाणे या प्रमुख जिल्ह्यातून जाणार आहे.

नागपूर-मुंबई शिघ्रसंचार द्रुतगती महामार्ग हा महाराष्ट्र राज्य महामार्ग (MSH) मानांकानुसार बांधण्यात येणार असून सदर महामार्ग हा राष्ट्रीय महामार्गाच्या दर्जाचा असेल.

श्री टोके यांनी सांगितले की सदरहू शीघ्रसंचार द्रुतगती महामार्ग विकसित करताना काही हरितपट्ट्याची होणारी हानी भरुन काढण्यासाठी प्रकल्प प्रवर्तक हरितप्ट्टा विकास करणा-या योजनांसाठी निविदा काढणार आहे. त्याचप्रमाणे शीघ्रसंचार द्रुतगती महामार्गातील खोदकाम बंद झालेल्या दगडाच्या खाणींचे रुपांतर जलकुंभात (पाणी साठवण टाकी) करण्याचा प्रस्ताव विचारात असून त्याबाबत जिल्हा प्रशासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. किंबहुना त्यामुळे प्रकल्पास लागणा-या पाण्याची निकड पूर्ण होईल व कायमची जलकुंभाची स्थानिकांना सोय होईल. त्यांनी सांगितले की सदरहू शीघ्रसंचार द्रुतगती महामार्ग बांधताना प्रवाशांच्या सुरक्षिततेचा विचार केलेला आहे.

प्रकल्प प्रवर्तकांच्या सादरीकरणानंतर मा. अध्यक्ष महोदयांनी उपस्थितांना काही आक्षेप, हरकती व सूचना असल्यास नमुद करण्याचे आवाहन केले.

खालील उपस्थितांनी चर्चेत भाग घेतला.

१. **श्री भास्कर गुंजाळ,** राहणार-काळोशी गाव, तालुका-इगतपुरी, जिल्हा-नाशिक यांनी आक्षेप नोंदविला की सदरहू प्रकल्पग्रस्त परिसर हा सुपिक जमिन व भातशेतीसाठी प्रसिध्द आहे. पण सदरहू जमिन विविध प्रकल्पांसाठी अधिग्रहित करण्यात आलेली होती. आता भातशेतीसाठी अत्यंत अल्प जमिन शिल्लक आहे. शिघ्रसंचार द्रुतगती महामार्ग विकसित करताना व पुर्ण झाल्यावर वाहनांमुळे होणा-या धुळीच्या प्रदूषणामुळे अगदी अल्पप्रमाणात राहिलेली भातशेतीही नष्ट होईल असी भिती स्थानिक शेतक-यांना वाटते.

समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना प्रकल्प प्रवर्तकांना याबाबतचे उत्तर देण्याची सूचना केली.

प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की प्रकल्प विकसित करताना धुळीचे प्रदूषण न होण्यासाठी सर्व उपाययोजना करण्यात येतील. ज्या ज्या वेळी आवश्यक आहे, तेव्हा पाणी मारण्यात येईल. त्याचप्रमाणे प्रकल्प पूर्ण झाल्यावर वाहनांमुळे ध्वनि प्रदूषणाचा त्रास न होण्यासाठी निवासी/लोकवस्ती जवळील जाणा-या महामार्गावर गरजेनुसार ध्वनी प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा (नॉईज बॅरियर्स) लावण्यात येतील.

२. **लक्ष्मण तात्याराव गव्हाणे**, राहणार कांचनगाव, तालुका – इगतपुरी, जिल्हा-नाशिक यांनी माहिती सांगितली की परिसरातील जवळजवळ ४३% जमिन ही अधिग्रहित करण्यात आलेली आहे व त्यांनी दिनांक २७-१०-२०१७ रोजी जिल्हा प्रशासनास याबाबत पत्र लिहिलेले असून त्याचे अदयाप पावेतो उत्तर मिळालेले नाही. त्यांनी ध्वनी प्रदूषणामुळे होणारे परिणामांवरील एक लेख अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समितीस सादर केला.

श्री गव्हाणे यांनी पुढे सांगितले की इगतपुरी व शहापुर हे भातशेतीसाठी प्रसिध्द तालुके आहेत. मात्र प्रस्तावित महामार्ग हा भातशेतीच्या जवळून जात असल्याने निश्चितच होणा-या धुळीप्रदूषणामुळे पिकांवर व मनुष्यप्राण्यांवर त्याचा दुष्परिणाम होईल.

त्यांनी पुढे असाही आक्षेप नोंदविला की जमिनीचा एकच पोत व शेजारीशेजारी शेत असताना शेतक-यांना वेगवेगळा मोबदला देण्यात आलेला आहे. जिल्हा प्रशासनाने त्याबाबत वस्तूस्थिती तपासून निर्णय घ्यावा. श्री गव्हाणे यांनी पुढे सांगितले की स्थानिक विकासाच्या विरुध्द नाहीत, पण शेजारील शेजारील शेतांचा मोबदला हा वेगवेगळा कसा असू शकतो.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी तथा जिल्हादंडाधिकारी यांनी जर त्रुटी असल्यास त्या निश्चितपणे सुधारण्यात येतील याची ग्वाही दिली.

३. **श्री अरुण भिकाजी गायकर**, राहणार – खैरगाव यांनी सांगितले की ते प्रकल्पग्रस्त असून खैरगाव ते प्रस्तावित महामार्ग यातील अंतर किती याबाबत विचारणा केली. त्यांनी पुढे प्रकल्प प्रवर्तक व जिल्हा प्रशासनास आवाहन केले की जर गावापासून जास्त अंतर वाढवून प्रस्तावित महामार्गाचा आराखडा केल्यास खैरेगावातील शेती ही वाचवता येईल. त्यांनी लेखीस्वरुपात आक्षेप नोंदविला.

४. **श्री लक्ष्मण तात्याराव गव्हाणे** यांनी ध्वनी प्रदूषणावरिल परिणामांवरिल विकेपिडीया संकतेस्थळावरिल संग्रहित माहिती पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समितीस सादर केली. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी सांगितले की सदरहू माहिती नियमाप्रमाणे ग्राह्य धरता येत नाही. जर शासनाचे त्याबाबत आदेश वा टिप्पणी असेल तरच त्याचा विचार करण्यात येईल.

५. **श्री कारभारी दुभाषी**, स्थानिक रहिवाशी यांनी आक्षेप घेतला की मोबदला देताना पाच वर्षे जे पीक लावले, त्याचाच विचार व्हावा. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी ७/१२ वर नोंद असल्याप्रमाणेच मोबदला देण्यात येईल असे सांगितले.

६. **नवले दुभाषी**, राहणार अच्युतवाडी यांनी आक्षेप नोंदविला की जरी जमिनाची पत/दर्जा जरी सारखाच असला तरी वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळा मोबदला देण्यात आलेला आहे. तरी रेडी रेकनरमध्ये बाबत सुधारणा करण्यात यावी.

बैठकीचा समारोप करताना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी उपस्थित शेतक-यांना सांगितले की, आपल्या देशात फक्त महाराष्ट्र शासनच जमिन अधिग्रहणाचा सर्वात जास्त मोबदला देते. तरी शेतक-यांनी शासनाने घोषित केलेल्या संधीचा फायदा घेण्याचे आवाहन केले.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी उपस्थितांना माहिती दिली की सादरीकरणात प्रकल्प प्रवर्तकांनी प्रदूषण नियंत्रण व पर्यावरण संरक्षण योजनांबाबत माहिती दिलेली असून ते त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करतील. प्रकल्प प्रवर्तक हे पर्यावरण संरक्षणास बांधिल आहेत. प्रस्तावित रस्ता पूर्ण झाल्यावर गरजेनुसार ध्वनी नियंत्रण सयंत्रणा (नॉईज बॅरियर्स) हे बसविण्यात येतील.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी बैठकीचा समारोप करताना सांगितले की बैठकीच्या इतिवृतान्ताबरोबरच प्राप्त झालेले सर्व आक्षेप केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयातील तज्ञ समितीस सादर करण्यात येतील व त्याबाबत केंद्र सरकार निर्णय घेईल.

अध्यक्षांनी उपस्थित शासकीय अधिकारी, प्रकल्प प्रवर्तक व जनतेचे सर्वांचे आभार मानून बैठक संपन्न झाल्याचे जाहिर केले.

(राधाकृष्णन् बी.)
अध्यक्ष,
पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती तथा
जिल्हादंडाधिकारी - नाशिक

(आर. यु. पाटील)
सदस्य तथा
प्रभारी प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ,नाशिक

(अ. ज. कुंडे)
समन्वयक तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ,नाशिक